**महिला या आज सर्वच क्षेत्रात आघाडीवर आहेत मग ते एखादे नवे क्षेत्र असो अथवा परिवारातील एखाद्या व्यवसायात सहभागी होऊन तेथे नवी उंची गाठणे असो या दोन्हीमध्ये महिला समर्थपणे उभ्या आहेत. पण पूर्णपणे पुरुषांचे वर्चस्व असलेल्या रस्ते निर्माण क्षेत्रात एखाद्या स्त्रीने स्व इच्छेने येण्याचे ठरवले तर...नाशिक मधील 40 वर्षाहून अधिक जुनी रस्ते निर्माण करणारी कंपनी एम.जी. नायर इन्फ्रास्ट्रक्चर च्या युवा संचालिका अश्विनी नायर यांची ही यशोगाथा.**



# रस्ते निर्माण क्षेत्रातील स्त्री शक्ती
# अश्विनी नायर

वडील एम.जी. नायर यांनी 1990 मध्ये नाशिक मध्ये रस्ते निर्माण क्षेत्रात उतरायचे ठरवले. आधीचा नोकरी /व्यवसायाचा थोडाफार अनुभव पण मुख्यत्वे करून कष्ट घेण्याची तयारी यामुळे अल्पावधीतच कंपनीला यश मिळत गेले.

पण काही कालावधीनंतर प्रकृतीच्या तक्रारींमुळे एम.जी. नायर यांनी काम कमी केले.

2017 मध्ये त्यांची एकुलती एक कन्या अश्विनी यांनी याच पुरुषप्रधान व्यवसायात उतरण्याचा निर्णय घेतला. स्वतः अभियांत्रिकी पदवीधर तसेच व्यवस्थापना चे पदव्युत्तर शिक्षण घेतलेल्या अश्विनी यांनी हा व्यवसाय नवीन उंचीवर नेण्याचा निर्धार केला. अर्थातच त्यांना भक्कम साथ होती ते पिता एमजी नायर व आई जया नायर यांची.

**प्रवास सुरू झाला :**

रस्ते निर्माण व्यवसाय करतांना त्याच्यासोबत अजून नवे काय करता येईल याचा विचार नेहमीच अश्विनी यांच्या मनात होता. त्यामुळे स्वतःचे बॅच मिक्स फ्लॅंट उभारणे, रस्ते निर्माण करतांना आवश्यक असणारी यंत्रसामग्री भाड्याने देणे असे व्यवसाय देखील सुरू केले.

ज्ञान, कौशल्य, तंत्रज्ञान व कामावरील श्रद्धा ही चतु: सुत्री ही प्रगतीची गुरुकिल्ली ठरली. सोबतच व्यवस्थापन कौशल्याने कामाचे योग्य ॲनालिसिस करून वेस्टेज कमी केल्याने प्रॉफिटबिलिटी देखील वाढली.










**अडचणींवर केली मात :**

शासकीय कंत्राटे मिळवताना तसेच कामाच्या आजूबाजूस अधिकांश पुरुष, तसेच कंपनी मध्ये अनेक जुने कर्मचारी देखील पुरुष त्याचमुळे या पूर्ण पणे पुरुष प्रधान क्षेत्रात आलेल्या एका स्त्रीला पटकन स्वीकारले गेले नाही. काही जणांनी तर चक्क 'असे क्षेत्र निवडण्यापेक्षा लग्न करून घे' असा सल्ला देखील दिला, पण अश्विनी आपल्या निश्चयावर ठाम होत्या आणि अवघ्या पाच वर्षातच त्यांनी स्वतःला सिद्ध केले. त्यामुळेच कधीकाळी वर्षाला दोन-तीन प्रकल्प करणारी एम.जी. नायर इन्फ्रास्ट्रक्चर ही कंपनी आज त्यापेक्षा अधिक प्रकल्पावर यशस्वी पणे काम करू शकत आहे.

महाराष्ट्रात काम करायचे तर स्थानिक भाषा आलीच पाहिजे हे ओळखून मातृ भाषा मल्याळी असताना देखील त्यांनी मराठी भाषा देखील आत्मसात केली व त्या आज अस्खलित मराठी बोलू शकतात. या मुळे त्यांना त्यांच्या सोबत काम करणाऱ्या सर्वांसोबत संवाद साधणे अधिक सोपे झाले आहे.

**स्त्रीमध्ये अथांग क्षमता :**

अश्विनी नायर यांच्या मते, स्त्री कोणत्याही क्षेत्रात कमी नाही. तिने घेतलेल्या शिक्षण व ज्ञानाचा पुरेपूर वापर केला पाहिजे. समृद्ध राष्ट्रासाठी स्त्रीची भूमिका अत्यंत मोलाची असल्याने देखील त्यांनी आवर्जून नमूद केले.

**(शब्दांकन - डॉ. अभिजीत चांदे**
**माध्यम व जनसंपर्क सल्लागार )**